# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 14.07.2025** **वार- सोमवार**

---

**मुख्यमंत्री**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ गड किल्ल्यांना युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत मान मिळाल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत निवेदन दिलं. ही दुर्गसंपदा राज्याचा वारसा असून, जागतिक पातळीवर हा मान मिळणं ही महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले. राज्यातल्या या किल्ल्यांचा, वारसा यादीत समावेश झाल्याबद्दल त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय सांस्कृतिक कार्य मंत्री, परराष्ट्र मंत्री, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांच्यासह राज्यातल्या इतर अधिकाऱ्यांचे आभार मानले. युनेस्कोने दिलेलं हे नामांकन टिकवणं मोठं आव्हान असून, या किल्ल्यांचा वारसा जपण्यासाठी नागरीकांनी हातभार लावावा असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी यावेळी केलं.

१२ गड किल्ल्यांना युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत मान मिळाल्याबद्दल विधानभवनाच्या परिसरातल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन करुन, आज आनंदोत्सव साजरा करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांच्यासह मंत्रिमंडळातले इतर मंत्री आणि आमदार यावेळी उपस्थित होते.

**विधानसभा**

बांधकामाचा राडारोडा टाकून पुणे शहर आणि भोवतालच्या टेकड्या विद्रुप करण्याचे प्रकार वाढले आहेत; सरकारने ते थांबवावेत, अशी मागणी आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी आज विधानसभेत केली. त्यावर राडारोडा वन विभागाच्या जमीनीवर किंवा अन्यत्र कुठेही टाकू दिला जाणार नाही, असं आश्वासन वनमंत्री गणेश नाईक यांनी दिलं. नागरिकांनी टेकड्यांवर राडारोडा टाकू नये यासाठी शहरांच्या हद्दीजवळ वन खातं, पोलीस खातं आणि महसूल खात्याचे अधिकारी देखरेख ठेवतील; सीसीटीव्ही कॅमेरे लावले जातील; असं नाईक यांनी सांगितलं.

**शेतकरीओळखपत्र**

ॲग्रीस्टॅक योजनेअंतर्गत राज्यातील दहा लाख शेतकऱ्यांची नोंदणी आणि शेतकरी ओळखपत्र  तयार करण्याचं उद्दिष्ट राज्य सरकारन ठेवलं आहे. यासाठी विशेष मोहीम हाती घेण्याचे निर्देश कृषी आयुक्तालयानं दिले आहेत. या महिना अखेरी पर्यंत ही नोंदणी पूर्ण करण्याचं उद्दिष्ट आहे, यापूर्वी मे महिना अखेरी पर्यंत हे लक्ष्य पूर्ण करण्याचं नियोजन होतं, परंतु नोंदणीची टक्केवारी कमी असल्याने आता ही मोहीम तातडीने राबवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

**महाईसेवाकेंद्र**

नागरी सुविधा केंद्र आणि महा ई- सेवा केंद्रातील संगणकीय यंत्रणेत सातत्यानं व्यत्यय येत आहे; यावर तातडीने उपाययोजना करावी असं निवेदन महा ई-सेवा केंद्र चालकांनी पुण्याच्या जिल्हाधिकाऱ्याना दिलं आहे.  ऑनलाईन अर्ज प्रक्रीयेमधे वारंवार अडचणी येत असल्याने विद्यार्थी, पालक आणि नागरीकांनाही त्रास सहन करावा लागत असल्याचं या निवेदनात म्हटलं आहे.

**स्मार्टस्वच्छतागृह**

पुणे महापालिकेतर्फे बालेवाडी परिसरात अत्याधुनिक आणि 'स्मार्ट' स्वच्छतागृह उभारले जाणार आहेत. हे स्वच्छतागृह पूर्णपणे वातानुकूलित असतील, तसंच तिथे मोबाईल, लॅपटॉप चार्जिंगची सुविधा आणि वायफाय देखील असेल. त्यासाठी ७१ लाख ६७ हजार रूपयांच्या निविदेला पुणे महापालिकेच्या स्थायी समितीने मान्यता दिली आहे.

**<u>पीसीएमसी</u>**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अग्निशामक विभागातील सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांसाठी पालिकेनं विविध प्रकारचे १० प्रशिक्षण अभ्यासक्रम तयार केले आहेत. संबंधित कर्मचाऱ्यांमध्ये तांत्रिक कौशल्य विकसित करण्याच्या उद्देशानं त्यांचा वयोगट, जबाबदाऱ्या आणि शारीरिक क्षमतांचा विचार करून हे अभ्यासक्रम तयार करण्यात आले आहेत. हरवलेल्या व्यक्तींचा ड्रोनच्या सहाय्यानं शोध, प्राथमिक उपचार, मर्यादित जागेतील बचाव पद्धती, खोल पाण्यातील बचाव कार्य अशा विविध कौशल्यांचा यात समावेश आहे.

**<u>अमलीपदार्थ</u>**

पुणे पोलिसांच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने दोन वेगवेगळ्या ठिकाणी केलेल्या कारवाईत ७ लाख ८८ हजार रुपयांचे अमली पदार्थ जप्त केले आहेत. या दोन्ही प्रकरणात मिळून पाच जणांना अटक करण्यात आली आहे.

**<u>ॲथलेटिक्स</u>**

पुण्यात नुकत्याच झालेल्या राष्ट्रीय खुल्या ॲथलेटिक्स स्पर्धेत पुरुष गटात ठाण्याच्या हर्ष राऊतने सर्वाधिक वेगवान धावपटूचा मान मिळवला; तर महिला गटात रिलायन्स स्पोर्ट्स फाउंडेशनची साक्षी चव्हाण सर्वोत्तम धावपटू ठरली. लांब उडी प्रकारात जे एस डब्ल्यूच्या श्री शंकरन याने प्रथम स्थान पटकावलं, शंभर मीटर धावणे प्रकारात महाराष्ट्राची चार्वी पुजारी प्रथम आली.

**<u>क्रीडा</u>**

कनिष्ठ आशियाई करंडक जुडो स्पर्धा आजपासून तैवानमध्ये सुरू होत आहेत. या स्पर्धेसाठी भारताच्या संघात पुण्यातील आदित्य परब याला स्थान मिळालं आहे. आदित्य महाराष्ट्रातून निवडलेला एकमेव खेळाडू आहे. शंभर किलोहून अधिक वजनी गटात तो सहभागी झाला आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज दिवसभर आकाश अंशतः ढगाळ होतं. आज कमाल तापमान २८ तर किमान तापमान २२ पूर्णांक ४ दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्याही आकाश ढगाळ राहून हलका पाऊस पडण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**